# निवडणूक निर्णय अधिकारी, जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक) तथा उपनिबंधक (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय


तिसरा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

दूरध्वनी (०२०) २६१२२८४६/४७ ईमेल : rojsb22@gmail.com


## संचालक मंडळ निवडणूक सन २०२२-२०२७
## निवडणूक अधिसूचना

मल्टिस्टेट को. ऑप सोसायटी ॲक्ट २००२ चे कलम ४५ तथा नियमावलीमधील नियम क्र. १९ चे अनुसार जनता सहकारी बँक लि., पुणे च्या उपविधी क्र. ३१ (बी) नुसार तयार करण्यात आलेल्या संचालक मंडळ निवडणूक नियमाच्या नियम क्र. ३ (अ) नुसार मी, **आनंद अ. कटके, निवडणूक निर्णय अधिकारी, जनता सहकारी बँक लि., पुणे** तथा उपनिबंधक, (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे जाहीर करतो की मल्टिस्टेट को. ऑप. सोसायटी ॲक्टनुसार नोंदणी झालेल्या खालील नमूद संस्थेची त्या समितीचे नावापुढे दाखविल्याप्रमाणे संचालकांच्या उपविधी क्र. ३१ (अ) (i) नुसार संचालक मंडळ सदस्यांची निवडणूक घ्यावयाची आहे. खालील अनुसूचीमधील अनु. क्र. ९ मध्ये निवडणूक नियम क्र. ५ मध्ये दिल्याप्रमाणे निवडणुकीची तारीख, वार व वेळ निश्चित करण्यात येत आहे. निवडणूक, तारीख, वार व वेळा खालीलप्रमाणे -

### निवडणूक घ्यावयाच्या मल्टिस्टेट सहकारी संस्थेचे नाव - जनता सहकारी बँक लि., पुणे

### अनुसूची

| | | |
|---|---|---|
| १) | नोंदणी क्र. | MSCS/CR/509/2012 |
| २) | संस्थेचे नाव व पत्ता :- | **जनता सहकारी बँक लि., पुणे**<br>१४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रोड, पुणे - ४११००२ (महाराष्ट्र) |
| ३) | मतदार संघाचा तपशील व संचालक संख्या :- | उपविधी क्र. ३१ (अ) (i) नुसार बँकेच्या कार्यक्षेत्रातील सभासदांमधून खालीलप्रमाणे (सर्व मतदारांद्वारा निर्वाचित) एकूण १७ संचालक -<br>१) सर्वसाधारण संचालक : १४<br>२) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींमधील संचालक : १<br>३) महिला राखीव संचालक : २<br>**एकूण संचालक संख्या : १७** |
| ४) | कोरे नामनिर्देशक पत्र वितरीत करणे तथा नाम निर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात करण्याची तारीख, वेळ तथा नामनिर्देशन पत्रे मिळण्याचे स्थान :- | दि. १५ जून २०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दररोज दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय उपनिबंधक, (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे, तिसरा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ |
| | नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख वेळ व जागा : | दि.२२ जून २०२२, वेळ : दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे कार्यालय |
| ५) | प्राप्त नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख व वेळ : | दि. १५ जून २०२२ ते दि. २२ जून २०२२ पर्यंत दररोज सायं. ५.०० वाजल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे कार्यालय येथे |
| ६) | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननीची तारीख, वेळ व जागा वा आक्षेप नोंदणी : | दि. २४ जून २०२२, वेळ : सकाळी ११.०० वाजता **(सदर ठिकाणाची माहिती संबंधित उमेदवारास मोबाईल/ईमेलवर कळविण्यात येईल.)** |
| | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख, वेळ व जागा | दि. २४ जून २०२२, वेळ : सायं. ५.०० नंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय येथे |
| ७) | नामनिर्देशन पत्र / उमेदवारी मागे (परत) घेण्याकरिता अंतिम तारीख, वेळ व जागा : | दि. २८ जून २०२२, वेळ : दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ८) | निवडणुकीकरिता वैध उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्याची तारीख व वेळ तथा उमेदवारांना निवडणूक चिन्ह वितरीत करणे : | दि. २९ जून २०२२ वेळ : सकाळी ११.०० वाजता यादी प्रसिद्ध करणे तसेच दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक चिन्ह वितरीत करणे. |
| ९) | आवश्यकता नुसार मतदानाची तारीख व वेळ :<br>**(बँकेचे विशेष सर्वसाधारण सभेत)** | दि. १७ जुलै २०२२, वेळ : सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत (दैनिक वर्तमानपत्रामध्ये मतदार केंद्रांची यादी प्रकाशित केली जाईल.) |
| १०) | मतमोजणीची तारीख, वेळ व जागा : | दि. १९ जुलै २०२२ वेळ : सकाळी ९.०० वाजेपासून मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत. (दैनिक वर्तमानपत्रात मतमोजणीचे स्थान प्रसिद्ध केले जाईल.) |
| ११) | मतमोजणीनंतर निकाल घोषित करण्याची तारीख व वेळ : | मतमोजणी समाप्त झाल्यावर विशेष सर्वसाधारण सभेत (मतमोजणीचे ठिकाणी) |

**सूचना :** (१) प्रत्येक कोरे नामनिर्देशन पत्र नि:शुल्क असेल. (२) प्रत्येक उमेदवारास नामनिर्देशन पत्रासाठी अनामत रक्कम रु. २०००/- रोखीने भरावी लागेल. (३) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील व तो निर्णय सर्व नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्यांना बंधनकारक राहील. (४) निवडणूक निर्णय अधिकारी मतदार केंद्राची यादी, स्थान हे मतदानांच्या तारखेच्या १० दिवस आधी बँकेच्या सर्व शाखातील सूचना फलकावर तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिद्ध करतील. (५) मल्टिस्टेट को. ऑप सोसायटी ॲक्ट नुसार निवडणूक प्रक्रिया सर्वसाधारण सभेत होणार असल्यामुळे सभासद मतदारांचे दृष्टीने मतदान करणे सोयीचे व्हावे म्हणून बँकेच्या ज्या गावांमध्ये शाखा आहेत अशा ठिकाणी मतदानाची व्यवस्था राहील व मतदानाकरिता उपस्थिती हीच विशेष सर्व साधारण सभेची उपस्थिती गृहीत धरण्यात येईल. (६) मतदान समाप्त झाल्यावर सिलबंद मतपेट्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे सुचनेनुसार निश्चित केलेल्या सुरक्षित ठिकाणी मतमोजणी पर्यंत ठेवण्यात येतील. (७) वरील अनुसूचीमध्ये दर्शविलेल्या तारखा/कालावधीमध्ये सार्वजनिक सुट्टी/ साप्ताहिक सुट्टी (रविवार) असल्यास त्या दिवशी निवडणूक कार्यालयाचे कामकाज बंद राहील. (मतदानाची तारीख सोडून). (८) मतदानासाठी येताना आवश्यक ते फोटो असलेले ओळखपत्र (सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागू असलेले) आणणे आवश्यक आहे.

Janata Sahakari Bank Ltd. Pune (BOD Election 2022) Returning Officer

(आनंद अ. कटके)
निवडणूक निर्णय अधिकारी, जनता सहकारी बँक लि., पुणे
तथा उपनिबंधक, (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

जा. क्र. ४/२०२२
पुणे, दिनांक : १५ जून २०२२